## काळाघोडा महोत्सव : 'सेल्फी' काढण्यासाठी मुंबईकरांची झुंबड

# मुंबईत अवतरली प्रस्तावित 'मेट्रो-३'!

मुंबई : वादाच्या विळख्यात अडकलेल्या मुंबईच्या पहिल्या भूमिगत 'मेट्रो ३'विषयी मुंबईकरांच्या मनात बरीच उत्सुकता आहे. हीच उत्सुकता काळाघोडा महोत्सवाच्या निमित्ताने प्रत्यक्षात साकारली असून येथील 'मेट्रो ३'च्या प्रतिकृतीसोबत सेल्फी काढण्यासाठी मुंबईकरांची एकच झुंबड उडत आहे.

काळाघोडा महोत्सवाच्या निमित्ताने विविध सामाजिक विषयांना वाचा फोडण्यात आली आहे. त्यात 'हॉर्स ऑफ होप' या इन्स्टॉलेशनच्या माध्यमातून चिठ्ठीवर आपल्या इच्छा-आकांक्षांचे संदेश लिहून घोड्याला लावण्यात आल्या आहेत. त्यात सात वर्षांच्या लहानग्यांपासून साठीच्या आजी-आजोबांचा समावेश आहे. तर 'प्लेज्ड् वॉल'मधून मुंबईकरांना




काळाघोडा महोत्सवात उभारण्यात आलेली मेट्रो ३ ची प्रतिकृती.

अवयवदान करण्यासाठी प्रेरणा देत तशी प्रतिज्ञा घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'सेलीब्रेशन ऑफ ड्रीम्स विथ काइट्स' या इन्स्टॉलेशनमधून आभाळाला भिडणारी स्वप्ने पाहा आणि पतंग उडविण्याप्रमाणे ती उंच उंच आभाळी पोहोचण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा, असा संदेश देण्यात आला आहे.

या महोत्सवात हातमागावर उदरनिर्वाह असणाऱ्या समाजाला प्रोत्साहित करण्यासाठी धाग्यांपासून घोड्याची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. शिवाय, या महोत्सवात घोड्याच्या प्रतिकृतीच्या माध्यमातून वस्त्रोद्योगाचा प्रवास मांडण्यात आला आहे. सोशल मीडियाच्या वाढत्या विस्तारामुळे पत्रलेखनाशी तुटणारी नाळ पुन्हा जोडण्यासाठी 'पोस्टकार्ड'ची आठवण करून देणारे इन्स्टॉलेशनही मुंबईकरांचे लक्ष वेधत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने मुंबईकरांना समाजाचे प्रतिबिंब पाहण्याची संधी मिळत आहे. (प्रतिनिधी)